# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ/महत्वाचे** जा.क्र.१०/एनजीपी/ संस्था स्थलांतर/२०१७/ 3500

कालमर्यादित दिनांक : 16 JUN 2017

ईमेलव्दारे

प्रति,
१)सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे
२) प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी
तंत्रनिकेतने, महाराष्ट्र राज्य

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या व्दितीय वर्षात / अभ्यासक्रमात बदल / स्थलांतराने संस्थाबदल करण्याबाबत.....**

**संदर्भ- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, यांचे दि. २४.४.२०१७ रोजीचे नोटीफिकेशन**

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया मा. आयुक्त व सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र शासन, राज्य सामाईक परीक्षा कक्ष, मुंबई यांचे मार्फत राबविण्यात येत आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी पदविका प्रथम अभ्यासक्रमाच्या थेट व्दितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु होत आहे.

प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पुर्ण केल्यांनतर म्हणजेच प्रथम व व्दितीय सत्र उत्तीर्ण असलेले किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैंकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेले, पाठयक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणा-या उमेदवाराला, जागांच्या उपलब्धतेच्या अधिन राहुन त्याच संस्थेत तसे बदल करण्याची मुभा राहील. तसेच हे बदल प्रथम वर्षाच्या /प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे करण्यात येतील. उमेदवार जो पाठयक्रम बदलुन घेणार आहे त्या पाठयक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने निर्धारीत केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी संबधित संस्थेच्या प्राचार्यांची राहील.

२. उमेदवाराचे एक किंवा दोन वर्षानंतर पाठयक्रम किंवा संस्था बदल खालील प्रमाणे करण्यात येतील.
( क ) प्रथम/व्दितीय वर्षात एकदा प्रवेश घेतलेला उमेंदवार त्या शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलुन मागण्यास पात्र असणार नाही.

( ख ) प्रथम वर्षाच्या परीक्षेमध्ये ( प्रथम व व्दितीय या दोन्ही सत्रांच्या )/व्दितीय वर्षांच्या परीक्षेमध्ये (तृतीय व चतुर्थ सत्रांच्या ) सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असणारा किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या विषयापैंकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेला उमेदवार तसेच व्दितीय वर्षातील बदलासाठी प्रथम वर्षात उत्तीण उमेदवारास संस्था किंवा पाठयक्रम बदलुन घेण्यास प्राप्त असेल.

आवक क्र. 5395
दिनांक 20 JUN 2017

( ग ) विनाअनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय, शासकीय अनुदानित विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित संस्था, कोणत्याही टप्प्यावर बदलुन घेता येणार नाही. तथापी शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित संस्थेतील विद्यार्थ्याला विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये बदल करुन देण्याची मागणी करता येईल.

( घ ) विद्यार्थ्यांना कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थांमध्ये बदलुन जाता येणार नाही.

( ङ ) विनाअनुदानित संस्थाचे प्राचार्य हे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या पुर्व मान्यतेने, संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पात्रता प्रमाणपत्र व रिक्त जागांबाबतची स्थिती सादर केल्यानंतर, बदल करुन घेण्याच्या मागणीसाठी इतर संस्थामधील उमेदवारांचा विचार करण्यात यावा. उमेदवार जो पाठयक्रम बदलुन घेणार आहे, त्या पाठयक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने निर्धारीत केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती संस्थेचे प्राचार्य किंवा संचालक करतील.

(च ) संस्थेच्या प्राचार्यांच्या शिफारशी शिवाय संस्था बदल अथवा पाठयक्रम बदलासाठीचा कोणताही अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाकडुन दाखल करुन घेतला जाणार नाही.

३. अधिसंख्य कोटयातील ( Supernumerary Quota ) जागे अंतर्गत प्रवेश देण्यात आलेले उमेदवार हे पाठयक्रम किंवा संस्था बदलण्यासाठी पात्र असणार नाहीत.)

४. विभागांतर्गत विद्यार्थ्यांचे संस्था बदल/पाठयक्रम बदलाबाबतची कार्यवाही त्या-त्या सहसंचालक, विभागीय कार्यालयाकडुन विहीत कालावधीत करण्यात यावी व त्याची एक प्रत तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा, मुंबई व मा. आयुकत, प्रवेश नियामक प्राधिकरण, म. रा., मुंबई यांना देण्यात यावी.

५. आतंर विभागीय विद्यार्थ्यांचे संस्था बदल/पाठयक्रम बदलासाठी विद्यार्थ्यांचे अर्ज आवश्यक कागदपत्रासह संबधित विभागीय कार्यालयामार्फत तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा, मुंबई येथे सादर करावेत. विहीत कालावधी नंतर प्राप्त होणा-या संस्था बदल/पाठयक्रम बदलासाठीच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच थेट व्दितीय वर्षाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेसाठी संचालनालयास रिक्त जागांचा तपशिल सादर करण्यापुर्वी दि. ३ जुलै २०१७ पर्यत विद्यार्थ्यांचे संस्था बदल/अभ्यासक्रम बदलाबाबतची कार्यवाही पुर्ण करावयाची आहे. त्यानंतर पोस्ट एस. एस. सी. थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीयेसाठी अभ्यासक्रम निहाय रिक्त जागांचा तपशिल संस्थेच्या लॉगीन मधुन ऑनलाईन पध्दतीने या संचालनालयास दि. ३ जुलै २०१७ रोजी ५.०० वाजेपर्यत कळविण्यांत यावा.

सही/-
(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१७/२२३४
दिनांक :- 21 JUN 2017

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित व खाजगी विना अनुदानित पदविका अभियांत्रिकी, तंत्रनिकेतने अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये संस्थेतील पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत सोबत जोडलेल्या संदर्भिय पत्रात नमुद केल्या नुसार कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- १. वरील प्रमाणे

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.